gulmohar 6_Layout 1 05/25/2024 9:53 PM Page 1





## हृदयातील संचित

राजेंद्र केरकर

# मांडवीच्या कुशीत सांत इस्तेव्हंव

**तिसवाडी हा गोव्याच्या जुन्या काबिजादीतला तालुका, मांडवी नदीच्या पात्रात अशा बेटांच्या निर्मितीसाठी ख्यात आहे. कुंभारजुवेच्या कालव्याद्वारे येणारी झुआरी आणि खांडेपार, म्हादई, वाळवंटी, डिचोली, कुडणे आदी उपनद्यांना कवेत घेतल्यानंतर मांडवीच्या पात्राशी तिचा संगम ज्या परिसरात होतो तेथे सुजलाम् आणि सुफलाम्मुळे ख्याती मिळवलेल्या बेटांची जणू काही साखळी निर्माण झालेली आहे. अशा बेटांत तिसवाडी महालातल्या सांत इस्तेव्हंव बेटाची निर्मिती ही निसर्गाची चमत्कृती आहे. आज हे बेट १९८० च्या आसपास पुलाची उभारणी झाल्यावर अंत्रुज महालातल्या खांडोळा - वरगावशी जोडलेले असले तरी त्याच्यापूर्वी या बेटाच्या चारही बाजूना मांडवी नदीचे पाणीच पसरल्याने मान्सूनच्या पावसाळ्यात या बेटावरती जाणे जोखमीचे ठरायचे.**

सह्याद्रीच्या घाट माथ्यावरती उगम पावणारी मांडवी पावसाच्या मौसमात मोठ्या प्रमाणात गाळ घेऊन, मैदानी प्रदेशात येते तेव्हा- हा गाळ त्याचप्रमाणे नदीच्या दुतर्फा असलेल्या किनाऱ्यावरच्या मातीची वृक्षतोडीमुळे होणारी धूप यामुळे या नदीच्या पात्रात शेकडो वर्षांपूर्वी चोहोबाजूनी पाण्याने वेढलेल्या भूभागाद्वारे बेटांची निर्मिती आलेली आहे. तिसवाडी हा गोव्याच्या जुन्या काबिजादीतला तालुका, मांडवी नदीच्या पात्रात अशा बेटांच्या निर्मितीसाठी ख्यात आहे. कुंभारजुवेच्या कालव्याद्वारे येणारी झुआरी आणि खांडेपार, म्हादई, वाळवंटी, डिचोली, कुडणे आदी उपनद्यांना कवेत घेतल्यानंतर मांडवीच्या पात्राशी तिचा संगम ज्या परिसरात होतो तेथे सुजलाम् आणि सुफलाम्मुळे ख्याती मिळवलेल्या बेटांची जणू काही साखळी निर्माण झालेली आहे. अशा बेटांत तिसवाडी महालातल्या सांत इस्तेव्हंव बेटाची निर्मिती ही निसर्गाची चमत्कृती आहे. आज हे बेट १९८० च्या आसपास पुलाची उभारणी झाल्यावर अंत्रुज महालातल्या खांडोळा - वरगावशी जोडलेले असले तरी त्याच्यापूर्वी या बेटाच्या चारही बाजूना मांडवी नदीचे पाणीच पसरल्याने मान्सूनच्या पावसाळ्यात या बेटावरती जाणे जोखमीचे ठरायचे. त्यामुळे ख्रिस्ती धर्मीय बहुसंख्य असलेल्या या बेटावरच्या वयात आलेल्या मुलामुलांच्या नात्याचे रूपांतर विवाहात व्हायचे, या बेटावरच्या मुलींचे अपवादात्मकरीत्या बाहेर गावच्या मुलांशी विवाह संपन्न व्हायचे.

पाण्याने चारही बाजूनी हे बेट वेढलेले असल्याकारणाने इथले भूमीपुत्र जन्मतः कष्टाळू होते. बारामाही कसल्या ना कसल्या पिकांची ते पैदासी करायचे. पावसाळ्यानंतर इथे तांबडी भाजी, मुळा, भेंडी, चिटकी या भाज्यांची मुबलक पैदासी व्हायची. श्रावण-भाद्रपदात इथल्या सात शिऱ्याच्या भेंड्याना परिसरात विशेष मागणी असल्याने, इथे त्यांची पैदासी केली जायची आणि त्यामुळे हे बेट शाकेचे किंवा भेडयांचे जुवे म्हणून ओळखले जायचे. मौसमी गावठी भाज्यांची पैदासी मांडवीच्या पाण्याने वेढलेल्या या बेटावरचे कष्टकरी करायचे. इथल्या भाजीपाल्याला त्याचप्रमाणे मौसमी आंब्याल्या बेटावरच्या मातीची आणि त्यातल्या गुणधर्माची-चव प्राप्त व्हायची. आज माशेलातल्या बाजारात चटकन जाऊन गरजेचा भाजीपाला, मासे, कडधान्य सहजपणे आणणे शक्य आहे. परंतु पूर्वी माशेल किंवा पणजीच्या बाजारपेठेत जाण्यासाठी जलमार्गाचा एकमेव आधार होता.

त्यामुळे उपलब्ध शेतजमिनीत आवश्यक धान्य, फळे, भाजी यांची लागवड आणि नदी- खाड्यातली मासेमारी करून जीवन जगण्याचा समर्थ पर्याय उपलब्ध होता. सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात हिंदू बहुसंख्य असलेल्या बेटावरती धर्मांतराचा वरवंटा फिरवल्याने इथे ख्रिस्ती धर्मीयांचे प्राबल्य निर्माण झाले. इथले कष्टकरी उपजतच धाडसी, नौकानयनात आणि पोहण्यात तरबेज असल्याने पोर्तुगीजांनी गोव्याहून पोर्तुगालला जलमार्गाद्वारे जाण्यासाठी दर्यावदी म्हणून सांत इस्तेव्हंव बेटावरच्या लोकांना प्राधान्य दिले. गोवा मुक्तीनंतरही या बेटावरच्या लोकांनी नौकानयनातले आपले कौशल्य आणि जिव्हाळा कायम राखला आणि त्यामुळे या बेटाची तारवट्यांचे जुवे अशी ओळख झालेली आहे. आजही देश-विदेशात इथले पुरुष बोटीवरती नोकरी करण्याला प्राधान्य देत असल्याने, त्यांची आर्थिक स्थिती सुदृढ असते.

पूर्वी सांत इस्तेव्हंव बेट पूर्णपणे मांडवीच्या पाण्याने वेढलेले असल्याने, आजच्यासारखे मासे बाजारातून विकत आणणे शक्य नव्हते आणि त्यासाठी त्यांनी मानस तंत्रज्ञान विकसित केले. मानसीच्या आधारे मासे, कोळंबी पकडणे त्यांना शक्य व्हायचे. कुपान येथील वाळळी, आरकाची आणि वावळकराची मानस, कर्पीन येथील तारो, टोलटो येथील पायण, इगर्जे येथील ताकाची आणि रुईची कालतोलाच्या मानशी इथल्या मत्स्यप्रेमींना चवदार माशांची रसद पुरवायच्या. मांडवी नदीमुळेच इथल्या लोकमानसाचे जगणे समृद्ध झाले होते. टोकवाडा येथील फेरीबोट डिचोलीतल्या पिळगाव-सारमानसात जाण्यापूर्वी सात इस्तेव्हंवला थांबा घ्यायची. आज पुलाच्या उभारणीमुळे फेरीबोटीचा वापर खूपच मर्यादित झालेला आहे. सांत इस्तेव्हंव बेटावरचे वातावरण आल्हादायक असल्याने इथे जसे दर्यावर्दी जन्माला आले तसेच वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, विज्ञान आदी क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावणारी व्यक्तिमत्त्वं उदयाला आली.

जेजुईत धर्माधिकाऱ्यांनी या बेटाचे ख्रिस्तीकरण केले आणि नवख्रिस्त्यांच्या सोयीखातर ख्रिस्ती प्रार्थनामंदिरांची ठिकठिकाणी उभारणी केली. त्यातली सांत इस्तेव्हंवच्या स्थापत्यकलेचे भूषण ठरलेली सेंट स्टिफन चर्चची उभारणी १५७५ साली केलेली आहे. या चर्चच्या उभारणीत युरोपमधल्या अनेक प्रार्थनामंदिराच्या स्थापत्यकलेतल्या विविधांगी पैलूंचा झालेला संगम पहायला मिळतो. अवरलेडी ऑफ रेमिडीस, क्रूसावचा येशू ख्रिस्त नोस्सा सिन्योरा दी बो वेंचर त्याचप्रमाणे सेंट डॉम्निक अदीच्या पुतळ्यांमुळे इथल्या धार्मिक संचितांची प्रचिती येते. टोलटो येथे अवर लेडी ऑफ बो वेंचरची चर्च असून, पूर्वी टोलटोतल्या जलमार्गातून होडीद्वारे जुन्या गोव्याकडे जाणाऱ्या धावजी येथे जाता यायचे. हा जलमार्ग रामाची तार म्हणून जुन्या काळी ओळखला जायचा. टोलटो आणि एकंदर या बेटावर ऐष आरामी जीवन जगणे सोयीचे असल्याने पोर्तुगीजांच्या राजवटीत फिदाल्गोची घरे उभारली होती. आज जेथे सांत इस्तेव्हंव किल्ल्याचे जीर्णावशेष आहे तेथून काही अंतरावरली सेक्रेड हार्ट ऑफ जिझस, सेक्रेड हार्ट ऑफ मेरी, ख्रिस्त द किंग यांची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. सोळाव्या शतकात या बेटाचे ख्रिस्तीकरण होण्यापूर्वी इथे रवळनाथ, सांतेर, क्षेत्रपाल ग्रामपुरुष, मल्लिनाथ आदी दैवतांची भव्य मंदिरे होती. जेसुईट धर्माधिकाऱ्यांनी विध्वंसाचे सत्र राबवल्याने भाविकांनी आपल्या देवतांचे स्थलांतर नदीपल्याड असलेल्या सौंदेकर संस्थानात समाविष्ट होणाऱ्या खांडोळेत केले.

सांत इस्तेव्हंव बेटावरून पूर्वीच्या काळी ओहोटीच्या वेळी पायवाटेनं पैलतीरावरच्या धावजीवरून जुन्या गोव्यात जाता येई आणि त्यासाठी ह्या पायवाटेवरती नियंत्रण ठेवता यावे म्हणून किल्लयाची उभारणी, टेहळणी करण्यात सुलभ असणाऱ्या टेकडीवरती करून, धावजीच्या बाजूस नदीकिनारी बुरुज बांधून तेथे कडेकोट बंदोबस्त केला होता. २४ नोव्हेंबर १६८३ रोजी छत्रपती संभाजी महाराजानी सांत इस्तेव्हंवच्या किल्ल्यावरती ताबा मिळवून नदीपल्याड असलेल्या जुन्या गोव्यावरती हल्ला करण्याची तयारी आरंभली होती. परंतु त्याचवेळी नदीला भरती आल्याने आणि मांडवी नदीच्या मुखावर आग्वाद, रेईस मागूस, काबो आणि मुरगाव ह्या किल्ल्यांच्या संरक्षणाखाली पोर्तुगीजांनी आपले आरमार सज्ज ठेवल्याने संभाजी महाराजांना आपला बेत बदलावा लागला. या साऱ्या इतिहासाचे हे बेट साक्षी होते. सांत इस्तेव्हंवपासून स्वतंत्र असे आणखी एक आखाडा बेट असून, तेथे भीमाने जरासंधाला ठार केल्याचे मानले जाते. या दोन्ही बेटांवरचा इतिहास घडविण्यास मांडवी नदी आणि तिच्या खाड्यांचे योगदान महत्त्वाचे आहे.




## मालवण तारकर्लीची
# ज्येष्ठांची सहल

गोवा आर्ट सर्कल प्रणित ज्येष्ठांच्या धमाल कार्यक्रमाचे आयोजन करणारे पणजीचे हरदिल अजीज कलाकार श्री. शशिकांत सरदेसाई यांच्या यंग सीनियर्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्थेसमवेत मालवण तारकर्लीला सहलीच्या आयोजनात सहभाग नोंदवला आणि धमाल केली. वीस एक जणांचा समूह, त्यात महिला तसेच पुरुष दोन्ही समसमान संख्येत होते, टेम्पो ट्रॅव्हलरद्वारे एक रात्र निवासी दोन दिवसीय सहलीचे नियोजन होते. सगळे जमलो आणि अंताक्षरी खेळत नॉनस्टॉप गाणी गात देवबाग तारकर्लीला अंमळ उशीरानेच पोचलो. मस्त मालवणी जेवण जेवून पोटावर हात फिरवत गल्लीबोळातून वाट काढत वाटेत मारुतीरायाच्या देवळाच्या पायऱ्यांवर फोटो काढून नदीकाठी पोचलो. विस्तीर्ण नदीच्या काळ्याशार निळाईने मन वेडावले. भराभर बोटीत बसून नदीतली सफारी सुरू झाली. मी तर चक्क मोक्याची जागा पकडून माझ्या करामती सुरू केल्या. दूरवर पाण्यात बराच वेळ जलसफर करतानाच आजूबाजूचा नयनरम्य परिसर पाहून मोहरायला झाले. वारा गात होता. त्यात आमचेही सूर आम्ही मिसळले. फोटोसेशनला तर पारावार नव्हता. थट्टामस्करी गप्पांचा ओघ कुणालाच आवरत नव्हता. नावाडी कोकणची माणसं साधी भोळी सारखाच होता. हात चालवतानाच त्याचा तोंडाचा पट्टा परिसराचा वेध घेत आम्हाला स्थलविशेष, स्थळमहात्म्य सर्व गोड मालवणीत पुरवित होता. आमच्या ज्ञानात भर घालत होता. पांडवकालीन मंदिर, चांडक पक्षी, वटवाघळे, कांदळाचे बन, घनदाट नारळाच्या झाडांचे बन, कुठे पांडवांचा मुक्काम सगळे दाखवत होता. दूरचे देवबाग, लाईट हाऊस अर्थात दीपस्तंभ, कुठे मगरी असतात, कुठे सीगल पक्षी येतात असे सगळे मालवणी सौंदर्य टीपत आमच्यापर्यंत पोचविण्यात तो आपले कसब वापरत होता. अधूनमधून नाचगाणी विनोद अर्थात हसी मजाक सगळं निसर्गाच्या सान्निध्यात मस्त चाललेलं. असे करत आमचा नौका विहार कधी संथपणे तर कधी मोठ्या लाटात हेलकावे खात आम्हाला सुंदर तारकर्लीचे तेवढेच विहंगम दर्शन करून राहिला. नंतर आलो वॉटर स्पोर्टस्ची मजा लुटायला. या इथे सर्वांसमोर पॅन्ट उतरवणे भाग होतं. लाज कोळून पीत मनाचा हिय्या करत ती सर्वांसमक्ष उतरवली आणि चड्डीत आलो. मला ते सगळे पाण्यातले क्रीडा प्रकार अनुभवायचे होते. पण आम्ही ठरलो सिनिअर सिटिझन्स त्यामुळे साठी सत्तरी ओलांडलेले सगळे असल्याने कोणाची या वयात रिस्क घ्यायची क्षमता नव्हती आणि ते सगळे वेळकाढू पण होतं. माझ्या मनात पुष्कळ होते की वॉटर स्पोर्ट्स बरोबर स्कुबा डायव्हिंगही करायचे. परंतु माझ्यासाठी सगळे खोळंबून राहतील, त्याचे काय असे वाटून गेले? पण आश्चर्याचा धक्का देत एक जण पाउणशे वयोमान असलेली माझ्या एवढीच उत्साही निघाली. म्हणजे माझ्याबरोबर ती पाण्यातली क्रीडा करायला तयार झाली. तिचा तो अदम्य म्हणा, दुर्दम्य आत्मविश्वास पाहून मी सुद्धा अचंबित झालो. मी फार तर एक दोन प्रकार करून समाधान मानलं असतं, परंतु त्या तिची संगत माझा उत्साह दुणावून गेली आणि आम्ही दोघांनी मिळून मस्त चक्क पाण्यात मजा केली. काय ते बनाना राईड, ते स्पीड बोट, अजून एक आलिशान आसन व्यवस्था असलेली सोफाराईड आणि शेवटी पॅराग्लायडिंगचाही हेका धरून बसली. आमच्या गोव्यात हे सगळे प्रकार आम्ही फक्त पाहिलेले कधी अनुभवले नव्हते, परंतु या माझ्या पाण्यात उतरलेल्या सहकारिणीने हे असले प्रकार जे आता आम्ही करणार होतो, ते अगोदरच केलेले त्यामुळेच तिचा आत्मविश्वास दांडगा दिसून येत होता. मी तरी थोडासा मनातून घाबरलेलो. वय झालंय आपलं, काय वाकडं तिकडं झालं तर काय घ्या, ही भीती मूर्तीमंत बनून उभी ठाकलेली. तरीपण तिच्यामुळेच माझा पॅराग्लाइडिंग करण्याचा निर्धार पक्का झाला. काय एक एक प्रकार. सगळे अनुभव पैसा वसूल होते. गोव्याच्या मानाने दरपत्रकही वाजवी होतं. स्पीड बोट धुंवाधार होती. आलिशान असं व्यवस्थित आसन असलेली एक राईड, सोबतीला माझी सहकारी, अगदी राजेशाही थाटात पार पडली. बनाना राईडचं तर क्या कहना? लांबलचक ते रबरी बनाना त्यावर आम्ही दोघे. सूं सूं करत पाणी चिरत, पाण्यातून वाट काढत आमचे बनाना आम्हाला दूरवर खोल पाण्यात घेऊन गेलं. आमचं वयोमान बघून त्यांनी शेवटी जे बनाना उपडे करतात तो भाग टाळलेला. परंतु या माझ्या सहकारिणीने ती मजा, म्हणजे आपली उपडी व्हायची अगोदर घेतली असल्याकारणाने तिनं ते त्यांच्या लक्षात आणून दिलं आणि म्हणते कशी वा रे वा शेवटचा भाग तो कसा काय तुम्ही डावलला? ते बापडे पोरगेले पाणीवीर वॉटर स्पोर्ट्स करणारे सवंगडी सांगायला लागले की ते तुम्हाला जमणार नाही. तर ही म्हणते कशी, का नाही? मी याच्या अगोदर केलेलं आहे आणि आताही मला ते पाहिजे आहे आणि तिने शेवटी जे बनाना उपडे करतात ते फिरून आम्हाला करायला त्यांना भाग पाडलं. ते पण तिच्या साहसापुढे फिके पडले आणि त्यांनी आमचे बनाना शेवटच्या क्षणी उपडे करून आम्हाला पाण्यात पाडले. मी घाबरलो तरी सावरलो. कारण या माझ्या पार्टनर पुढे माझा निभाव लागला नाही. तिथून पुढे ती पॅराग्लायडिंग आपण दोघांनी करूं चा आग्रह धरायला लागली आणि मी तिच्यापुढे सपशेल नांगी टाकली. आणि आमची स्वारी पॅराग्लाइडिंग पण करून राहिली. हा प्रकार तर अफलातून होता. त्या पॅराशूट सदृश्य बलून मधून आम्ही दोघांनी पाण्याच्या भरपूर वर जात उंच आकाशात मस्त पॅराग्लायडिंग केलं. जणू स्वर्गारोहण केल्यासारखेच वाटले. खाली निळाशार समुद्र वर आम्ही अंधातरी लटकलेलो, आकाशातील ते लोंबळकणे... वा जाम मजा आली. वर पोचल्यावर माझी कळी आणखीन खुलून चक्क आम्ही दोघांनी मिळून तारस्वरात गाणंही गाईलं. कुठलं माहीत आहे ? आसमान से आया फरिश्ता प्यार का सबक दिखलाने, दिल में है तस्वीर यार की लाया हु वो दिखलाने, कहो प्यार है तुमसे... ऑन इविनिंग इन पॅरिस मधलं गाणं जोरकसपणे तारकर्ली मध्ये ऑन इव्हिनिंग इन तारकर्ली करत जोश पूर्ण गायिलं. नंतर माझ्यावर की पॅराग्लायडिंग वर माहीत नाही, पण मोहीत होऊन ती गाऊन राहिली, ले गई दिल गुडिया जापान की पागल मुझे कर दिया.... मालवण .. लव इन तारकर्ली. तुम्हाला सांगतो की पॅराग्लाइडिंगची मदहोशी म्हणा बेहोशी पॅराग्लाइडिंग संपल्यावर सुद्धा सरता सरत नव्हती. त्याच मदहोशीत आम्ही थकले भागलेले असलो, पाण्याने चिंब भिजून उत्तेजित आमच्या बाकी सवंगड्यांकडे लॉजवर आलो. सगळ्यांना अजून धक्का देत आत येताना एंट्री घेत आम्ही गाऊन राहिलो.. आज मदहोश हुआ जाए रे मेरा मन मेरा मन मेरा मन, शरारत करने को ललचाये रे मेरा मन मेरा मन मेरा मन आणि त्याच मनाच्या धुंदीत तारकर्लीच्या पाम विस्ता लॉजच्या कुशीत उशी घेऊन शांत झोपलो. परंतु झोपायच्या अगोदर त्या तिथल्या रम्य परिसरात करमणुकीच्या कार्यक्रमाचे पण आयोजन केलेले. सहलीला आलेल्या प्रत्येकाने आपल्या अंगच्या कलागुणांचा आविष्कार दाखवीत सगळ्यांचे मनोरंजन केले. कुणी कविता सादर केल्या तर कोणी गाणी गायली. कोणी नुसते भाषण ठोकले तर कुणी पशुपक्ष्यांचे आवाज काढून दाखवले. पशु पक्ष्यांचे आवाज काढणारा हा कुंकळीचा अवलिया कृष्णा नाईक, प्राण्यांचे एवढे हुबेहुब आवाज काढतो म्हणून सांगू? कुत्र्याचे आवाज काढताना मालवणातील सगळी कुत्री त्याच्या दिशेने तोंड करून भुंकू की हो लागली. जाम मजा आली. सहलीचा दुसरा दिवस मुक्काम पोस्ट मालवण होता. येवा कोकण आपलाच आसा सांगणाऱ्या मालवणान नेमका काय बघू चा ते आमचे ठरले नव्हते. सगळ्यांना विचारूनच मग मालवण समुद्रात किल्ला शिवाजी आत कसा शिरलावाला किल्ला सोडून मग आमचे रॉक गार्डन आणि त्याला जोडून असलेले गणेश मंदिर पाहायचे ठरले. माझ्या मनात किल्ला सर करायचा होता, पण समूहात सगळ्याबरोबर राहणे शिस्तीचा भाग असतो. त्यामुळे मग चिंचोळ्या रस्त्यातून वाट काढत आमची बस मग मालवण पालथं घालत रॉक गार्डनच्या शोधार्थ निघाली. सकाळच्या नाश्त्यात सर्वांना घावणे खायला मिळालेले. त्यामुळे सगळ्यांची पोटे टम्म भरलेली होती. गरम गरम घावणे खाताना मात्र गरमागरम घावणे एक एक येत असल्याकारणाने आता मला की तुला असे करत वाट पहात नाश्ता करावा लागला. परंतु तिकडेही नाश्त्याच्या टेबलावर थट्टा मस्करी विनोद उतू चाललेले. त्यात कोणी उशिरा येऊनही नाश्त्याला पहिला नंबर ( पान ७ वरून)

**सहलीचा दुसरा दिवस मुक्काम पोस्ट मालवण होता. येवा कोकण आपलाच आसा सांगणाऱ्या मालवणान नेमका काय बघू चा ते आमचे ठरले नव्हते. सगळ्यांना विचारूनच मग मालवण समुद्रात किल्ला शिवाजी आत कसा शिरलावाला किल्ला सोडून मग आमचे रॉक गार्डन आणि त्याला जोडून असलेले गणेश मंदिर पाहायचे ठरले. माझ्या मनात किल्ला सर करायचा होता, पण समूहात सगळ्याबरोबर राहणे शिस्तीचा भाग असतो. त्यामुळे मग चिंचोळ्या रस्त्यातून वाट काढत आमची बस मग मालवण पालथं घालत रॉक गार्डनच्या शोधार्थ निघाली. सकाळच्या नाश्त्यात सर्वांना घावणे खायला मिळालेले.**

यशवंत (सुरेंद्र) शेट्ये,
खोर्ली म्हापसा





## कथन

– कविता आमोणकर

# नात्यातील संवाद

जेव्हा दोन व्यक्ती जेव्हा एकमेकांशी बोलतात, आपल्या मनातले विचार आदान प्रदान करतात, आपल्या सुख दु:खाच्या गोष्टी एकमेकांना सांगतात तेव्हा संवाद सुरू होतो. हा संवाद आपल्या कुटुंबातील व्यक्तींशी, आपल्या कामाच्या किंवा व्यवसायाच्या ठिकाणी असणाऱ्या व्यक्तींशी तसेच आपल्या मित्र मैत्रिणींशी मुख्यत्वे होत असतो.

जेव्हा हा संवाद होत असतो, तेव्हा मनातील भावना एकमेकांशी व्यक्त होत असतात. त्यामुळे मनात साचलेले विचार मोकळे होतात. कधी कधी रोजच्या जीवनातील असह्य ताणामुळे मनात अनेक विचारांची गर्दी झालेली असते. हे विचार व्यक्त न झाल्याने मनात साचून राहिलेले असतात. त्यामुळे साहजिकच त्यांचा ताण आपल्या नाजूक मनावर पडत असतो. आपल्या आवडत्या किंवा जवळच्या व्यक्तींबरोबर आपण जेव्हा एकत्रित येतो, तेव्हा साहजिकच आपल्या मनातले विचार त्यांच्यापाशी व्यक्त करतो. मनातली ही साचलेली विचारांची गर्दी आपण जेव्हा मोकळी करतो, तेव्हा मन हलके होते. प्रवाही बनते. आणि मन परत एकदा नवीन विचार करण्यास प्रवृत्त होते. हा झाला संवादाचा सकारात्मक परिणाम. हा संवाद आहे, तिथपर्यंत ठीक आहे, पण जेव्हा या संवादातला 'स' जेव्हा हरवतो, तेव्हा उरतो तो फक्त वाद. आज रोजच्या जीवनात वावरताना आपण जर नीट डोळे उघडून पाहिले तर संवाद कमी आणि वाद जास्त अशी परिस्थिती निर्माण झालेली दिसते. एकमेकांना समजून घेऊन त्यांच्याशी जुळवून घेणे तर काही काही वेळेस महाकठीण होऊन बसलेले दिसते. संवाद मधील जेव्हा 'स' हरवतो, तेव्हा वादाची ठिणगी पडते. आणि ही ठिणगी केव्हा उग्र स्वरूप धारण करेल, याचा काही नेम नसतो. नको त्या निरर्थक गोष्टींवर विनाकारण वाद घातला, की वाद हा होणारच. कधी कधी असेही होते, की दोन व्यक्तींमधील संवाद सुरळीत चालू असेल, तर काही व्यक्तींच्या डोळ्यांत ते खुपते. आणि त्या दोन व्यक्तींमधील संवाद संपुष्टात आणून त्यांच्यात वादाची ठिणगी कशी लावून द्यायची, या विषयात काहींनी जणू पीएचडी प्राप्त केलेली असते. या दोन व्यक्ती कुटुंबातील व्यक्ती असू शकतात किंवा मित्र मैत्रिणीही असू शकतात. काही बरे चाललेले असताना त्यांचे बरेपण हे काही नतद्रष्ट लोकांना सहन होत नाही आणि मग या दोन नात्यातला चालत आलेल्या संवादातील 'स' पद्धतशीरपणे काढून त्यांच्यातल्या नात्यातली दरी वाढवण्याचे काम पद्धतशीरपणे चालू होते. अशी ज्यांची वृत्ती असते, ही वृत्ती समाजासाठी फार घातक असते. अशी वृत्ती असणाऱ्या व्यक्ती या समाजात एकलकोंडी असतात. त्यांचा मित्रपरिवार मोठा नसतो. स्वत: भोवती चौकट आखून ते जगत असतात. कुटुंबातील इतर व्यक्तींशी त्यांना काही देणे घेणे लागत नाही. समाजाशी संवाद साधणे तर त्यांना जमत नाही. त्यांना फक्त स्वत:च्या सुखाची पर्वा असते. इतरांना तुच्छ लेखण्यात त्यांना परमानंद वाटतो. आपण ज्या समाजात निर्भीडपणे राहतो, सुरक्षितपणे फिरतो, आपले विचार व्यक्त करतो, त्या समाजाचे आपल्यालाही काही देणे लागते. समाजाशी जुळवून घेताना त्या आधी आपल्या कुटुंबाशी जुळवून घेणे गरजेचे असते. ही जुळवून घेण्याची क्षमता अंगी बाणवली की मग आपण कुठेही सामावून जातो. एकमेकांशी जुळवून घेण्याची सवय नसते, त्यांना फक्त आपले काम साधण्यापलीकडे काही विचार नसतो.

संवाद आणि वाद होत असताना त्यातील सत्य आणि असत्य, समज आणि गैरसमज या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हे लक्षात घ्यावयास हवे.

जेव्हा संवाद चालू असतो, तेव्हा एका हृदयाचा दुसऱ्या हृदयाशी संवाद होत असतो, परंतु जेव्हा त्यातील 'स' हा लुप्त होतो, तेव्हा होणारा वाद हा नकारात्मक गोष्टींनी भारलेला असतो. दोन व्यक्तींमधील वर्षानुवर्षे चालत असलेल्या संवादातील 'स' काढण्याचे कटकारस्थानाचे काम काही हितशत्रू किंवा आपलीच माणसे अगदी पद्धतशीरपणे आखणी करून करत असतात. दोन नात्यांमध्ये वितुष्ट आणण्याचे काम करण्याचा जणू अशांनी चंग बांधलेला असतो. दोन नात्यांतली वीण ही संवादाच्या धाग्यात गुंफलेली असते. जशी वर्षे उलटतात, तशी त्यांच्या नात्यातली वीण ही अधिकाधिक घट्ट होत असते. त्यांच्यातील प्रेम हे वृद्धिंगत होत असते. जेव्हा नात्यातली ही वीण घट्ट होत असते, तेव्हा ही वीण उसवण्याचे काम आपल्या जवळचीच माणसे करत असतात, तेव्हा आपल्याला त्याची कल्पनाही येत नसते. चेहऱ्यावर शांततेचा बुरखा पांघरून या अशा व्यक्ती आपले काम अगदी बिनबोभाटपणे निभावत असतात. दोन नात्यांमध्ये एकदा का द्वेषाची ठिणगी लावून दिली, की मग अशांना समाधान लाभते. नात्यातली घट्ट वीण जेव्हा अशा घातक व्यक्तींमुळे उसवली जाते, तेव्हा उरते ती भयाण शांतता... कारण जेव्हा संवादातले शब्दच जिथे मुके होतात, तिथे भावना, प्रेम, ममता या मौल्यवान गोष्टी खोट्या वाटू लागतात आणि भावनेचा, प्रेमाचा ओलावा नाहीसा होतो. खोट्यानाट्या गोष्टींनी कान भरल्यामुळे एकमेकांवरचा विश्वास उडतो. मग सुखाचे चित्र विस्कटायला वेळ लागत नाही आणि होत्याचे नव्हते होऊन जाते. त्यासाठी आपल्या जवळपास असणाऱ्या व्यक्तींना ओळखायला शिकणे ही कला आत्मसात करताना गोड बोलण्याच्या मागे किती कटूता भारलेली आहे, हे समजून चुकले की मग दोन नात्यांमधला संवादातील 'स' आपण कसा जपून ठेवावा, याची प्रचिती नक्कीच येईल.

**जेव्हा हा संवाद होत असतो, तेव्हा मनातील भावना एकमेकांशी व्यक्त होत असतात. त्यामुळे मनात साचलेले विचार मोकळे होतात. कधी कधी रोजच्या जीवनातील असह्य ताणामुळे मनात अनेक विचारांची गर्दी झालेली असते. हे विचार व्यक्त न झाल्याने मनात साचून राहिलेले असतात. त्यामुळे साहजिकच त्यांचा ताण आपल्या नाजूक मनावर पडत असतो. आपल्या आवडत्या किंवा जवळच्या व्यक्तींबरोबर आपण जेव्हा एकत्रित येतो, तेव्हा साहजिकच आपल्या मनातले विचार त्यांच्यापाशी व्यक्त करतो.**